# Washim District Police

**Nature of Work** :- **Raid on Gutkha**

**Police Station** :- **LCB**

**Date of Good Work done** :- **11/05/2020**

**Brief of the work done :-**

स्थानिक गुन्हे शाखेने रिसोड तालुक्यातील भोकरखेडा येथून ४.३५ लाखांचा गुटखा जप्त केला दि. ११/०५/२०२०

लोकमत

# भोकरखेडा येथून ४.३५ लाखांचा गुटखा जप्त!

**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई । राहत्या घरातून सुरु होती गुटखा विक्री**

लोकमत न्युज नेटवर्क

**रिसोड** : तालुक्यातील भोकरखेडा येथील एका घरात धाड टाकून ४ लाख ३५ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवार, ८ मे रोजी रात्री उशिरा केली.

प्राप्त माहितीनुसार, भोकरखेडा येथील रहिवासी दत्ता कौतीका रंजवे याच्या घरात मोठ्या प्रमाणात गुटखा साठवून ठेवल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. त्यावरुन ८ मे रोजी पोलीस निरीक्षक शिवाजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने दत्ता रंजवे यांच्या घरी जाऊन त्यांना घराबाहेर बोलाविले व पंचासमक्ष घराची झाडाझडती घेतली. यावेळी घरात १९ बोऱ्यांमध्ये गोवा १००० कंपनीचा गुटखा (किंमत ४ लाख ३५ हजार) आढळून आला. घटनास्थळी पोलीस उप निरीक्षक भगवान पायघन यांनी दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा करुन गुटखा जप्त केला. सदर गुटखा सुरक्षीततेच्या दृष्टीने रिसोड पोलिस ठाण्यात ठेवण्यात आला असून पुढील कार्यवाहीसाठी प्रकरण अन्न व औषधी प्रशासनाकडे वर्ग करण्यात आले.



भोकरखेडा येथील आरोपीसमवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी.

या कारवाईत पोलीस उप निरीक्षक भगवान पायघन यांच्यासह सहायक पोलिस निरीक्षक संजय नंदकुले, बाळासाहेब कंकाळ, राजेश गिरी, किशोर खंडारे, प्रेमदास आडे, राम नागुलकर, मिलींद गायकवाड आदिंनी सहभाग नोंदविला.

(प्रतिनिधी)

## गुटखामाफियांवर पोलिसांचा विशेष 'वॉच'

कोरोना विषाणू संसर्गाच्या पृष्ठभुमीवर सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यास सक्त मनाई करण्यात आलेली आहे. नियमाचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कारवाई देखील केली जात आहे. असे असताना गुटखा खाऊन थुंकण्याचे प्रमाण सुरुच आहे. त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी गुटखा विक्री व गुटखा माफीयांवर पोलिसांनी विशेष 'वॉच' ठेवणे सुरु केले आहे.

Hello Washim
Page No. 2 May 10, 2020
Powered by: erelego.com